**MHOS080007802021**

नियमित दिवाणी दावा क्रमांक २५१/२०२१
संभाजी ..वि.. किसन

## निशाणी क्रं. ५४ खाली आदेश पारीत

वादी तर्फे साक्षीदार गुलाब संभाजी कांबळे याची साक्ष विचारात घेतली जाणार नाही असा दिनांक ०८/०७/२०२५ रोजी झालेला आदेश रद्दबातल होऊन सदर साक्षीदाराची साक्ष विचारात घेण्यात यावी याकरीता अर्ज केलेला आहे.

२. वादी यांचे कथनाप्रमाणे, वादी यांचे साक्षीदार जवळचे नातेवाईक आजारी असल्यामुळे बाहेरगावी गेले होते. त्यामुळे वेळेवर तारखेला हजर न राहिल्यामुळे दिनांक ०८/०७/२०२५ रोजी वादीतर्फे साक्षीदाराची साक्ष विचारात न घेण्याचा आदेश वादी विरूध्द झालेला आहे. तसेच त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर दाव्याप्रकरणी त्यांना सदर साक्षीदाराची साक्ष नोंदविली नाही तर त्यांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचा झालेला आदेश रद्दबातल होवुन, सदर साक्षीदाराची साक्ष विचारात घेणे योग्य व न्यायाचे आहे अशी विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादीने यांनी सदर अर्जाच्या मागील बाजूस म्हणणे दाखल करून त्यांनी असे कथन केले आहे की, दि. १०/०३/२०२५ रोजी सदर वादी यांनी साक्षीदाराचे शपथपत्र दाखल केले होते. परंतु त्यानंतर वादी हे सातत्याने गैरहजर राहिल्यामुळे त्यांच्या विरूध्द सदर साक्षीदाराची साक्ष विचारात न घेण्याचा आदेश वादी विरूध्द नि.क्र. ५४ खाली दिनांक ०८/०७/२०२५ रोजी पारीत करण्यात आलेला आहे. तसेच अर्जामध्ये नमुद करण्यात आलेले कारण योग्य व संयुक्तीक नसल्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा, अशी विनंती केलेली आहे.

**४.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व त्यावरील म्हणणे व संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. असे दिसुन येते की, वादी यांनी पुराव्याचे शपथ दिनांक १०/०३/२०२५ रोजी दाखल केलेले आहे. त्यानंतर दिनांक ०८/०७/२०२५ रोजी वादीतर्फे साक्षीदाराचा पुरावा ग्राहय धरला जाणार नाही असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

**५.** सदर प्रकरण हे आजरोजी वादीच्या पुराव्याकरीता आहे. वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये दिलेले कारण हे योग्य व संयुक्तीक नसुन, त्यांनी दिलेल्या करणासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. परंतु सदर मुळ दाव्याचे स्वरुप पाहता, सदरचा दावा निरंतर मनाईचा हुकुम मिळण्याबाबतचा आहे. तसेच सदर प्रकरण स्थावर मिळकतीशी संबंधीत असल्याने आणि न्यायाच्या दृष्टीने वादीस त्यांच्यातर्फे सदर साक्षीदाराची साक्ष नोंदविण्याची संधी देणे योग्य व न्यायाचे वाटते. तसेच दोन्ही पक्षकारांची बाजु विचारात घेवुन न्यायनिवाडा करणेस मदत होईल. त्यामुळे प्रतिवादी यांना त्रास व गैरसोय झालेली आहे. त्याबद्दल त्यांना नुकसान भरपाई पोटी दाव्यातील वादीवर कॉस्टची रक्कम भरण्याच्या अटींवर त्यांना सदर साक्षीदाराची साक्ष नोंदविण्याची परवानगी देवुन, त्यांचा अर्ज मंजूर करणे योग्य होईल. करीता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात आला.
२. वादी यांना सदर साक्षीदाराची साक्ष नोंदविण्याची परवानगी रक्कम रुपये ५००/- च्या खर्चाच्या रकक्मेवर देण्यात येते.
३. वादी यांनी वरील नमुद खर्च प्रतिवादी यांना लवकरात लवकर दयावा.

PRAVIN SHAMRAO BANKAR

Digitally signed by PRAVIN SHAMRAO BANKAR
Date: 2026.01.19 17:38:20 +0530

**दिनांक :-** १९/०१/२०२६

**( पी.एस.बनकर )**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, लोहारा

<u>**CERTIFICATE**</u>

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Sr.Clerk | : | M.M.Shaikh |
| Court Name | : | Shri. P.B.Bankar, CJJD Lohara. |
| Date | : | 19.01.2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 19.01.2026 |
| Judgment uploaded on | : | 19.01.2026 |